
# सोनवारा

*बागेतल्या रानव्याची गोष्ट...*

**मृणालिनी वनारसे**

**चित्रांकन - निधी शहा**



# सोनवारा

*बागेतल्या रानव्याची गोष्ट...*

**मृणालिनी वनारसे**

**चित्रांकन - निधी शहा**

**सोनवारा (बागेतल्या रानव्याची गोष्ट)**

Sonwara (Bagetalya Ranvyachee Goshta)

**© मृणालिनी वनारसे**

प्रकाशक : विद्यानिधी (प्रसाद) वनारसे
आवर्तन, ५ हिल व्ह्यू सोसायटी
४६/५ एरंडवणे, पौड रस्ता,
पुणे - ४११०३८.
फोन : ९८२२०३८३६४

मुद्रक : सुश्रुत कुलकर्णी
अमलताश बुक्स,
नीलरतन अपार्टमेंटस्, कर्वेनगर, पुणे ४११०२९.
फोन : ९८२२५२२४७५


मुखपृष्ठ : निधी शहा

पहिली आवृत्ती : नोव्हेंबर २०२०

किंमत : २०० रुपये

---

पुढील आवृत्त्यांची प्रसिद्धी, भाषांतर, नाटक, सिनेमा, डिजीटल माध्यमे, टी.व्ही. आदी यांच्या रूपांतराचे सर्व अधिकार मृणालिनी वनारसे यांच्याकडे आहेत. मृणालिनी वनारसे यांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करू नये.



एक झेन गोष्ट आहे. जपानच्या राजानं एका झेन गुरुंकडून बागकामाचे धडे घेतले. तीन वर्षं उलटल्यावर झेन गुरू म्हणाले, ''शिकवायचं ते सारं शिकवून झालं आहे. केव्हातरी मी तुझ्या बागेला आकस्मिक भेट देईन. तुझ्या विद्येचं, कौशल्याचं परीक्षण करेन.'' त्यांनी राजाचा निरोप घेतला.

राजा आपल्या शाही बागेची अधिकच निगुतीनं काळजी घेऊ लागला. कोणता दिवस परीक्षेचा ठरेल कुणी सांगावं! बगिचा नेहेमी साफसूफ, नीटनेटका ठेवला जात असे. अनेक माळ्यांना हाताखाली घेऊन राजा बागेवर मेहनत घेत राहिला, त्या दिवसाची वाट पाहत राहिला. अखेर एके दिवशी झेन गुरू राजाची बाग पाहण्याकरता आले. राजाला फार आनंद झाला. गुरू शांतपणे बागेतून फेरफटका मारू लागले. राजा मूक उत्कंठेनं त्यांच्या मागे चालत राहिला. गुरुंच्या चेहऱ्यावरील प्रसन्नता नाहीशी होतेय असं त्याला वाटू लागलं. 'आपल्या हातून काही चूक घडली की काय? कुठे बरं कमी पडलो आपण?'

न राहवून राजानं मौनभंग केला : ''काय झालं? आपल्या शिष्यानं बागेवर प्रचंड कष्ट घेतल्याचं पाहून आपल्याला आनंद झाल्याचं दिसत नाही. काही चुकलं का आमचं?''

''बाकी सर्व छान आहे, पण सोनसळी पानं कुठायत? त्यांचा सोनवारा कुठाय? त्याच्याविना बाग अगदी खेळण्यातली, कृत्रिम वाटतेय.''

राजानं बागेतील एकूणेक पाचोळा, सुकलेली पानं, अगदी झाडांवरची पिकली पानंसुद्धा कचरा म्हणून गोळा करवली होती. केराच्या टोपल्या बागेच्या मागच्या भिंतीलगत रचून ठेवल्या होत्या. गुरुंनी तिथं जाऊन काही टोपल्या आत

आणल्या आणि मुठी भरभरून पिवळी, वाळकी, मातकट सोनेरी पानं बागेत उधळली. वारा वाहू लागला तशी पाचोळ्याची सळसळ, सोनेरी नाचगाणं सुरू झालं, त्यांच्या स्पर्शानं वारा जणू सोनेरी झाला.

ही गोष्ट वाचली तेव्हा वाटलं, ही माझ्याच बागेची गोष्ट आहे. पिवळी, वाळकी, सोनेरी पानं झाडांच्या मुळांशी विसावत असलेली बाग. मृत्यू हा जीवनाचा शत्रू नव्हे, सहचर आहे असं मूळ झेन गोष्टीचं सूत्र. मला एवढंच माहितेय की झाडाची पानं गळून खाली पडणं, त्याचे गालिचे तयार होणं त्यात असंख्य जीवांनी आसरा शोधणं हे मी गेले अनेक वर्षं अनुभवते आहे. सरत्या उन्हाळ्यात वळीवाच्या वावटळीनं उडवलेली सळसळ मी वर्षानुवर्षं मनात साठवली आहे.

शेजाऱ्यांना नको असतात पानं गाळणाऱ्या फांद्या. उन्हाळ्यात ज्या झाडाच्या सावलीसाठी सारे धावतात त्याच झाडाची थंडीतली पानगळ बघून कपाळावर त्रासिक आठ्या उमटू देतात. कचरा! एका शेजाऱ्यानं तर तिथे बसलेलं घुबड त्याच्या स्वप्नात येत असल्याचं सांगितलं होतं. मला वाटलं, छानंय स्वप्न! पण ती तक्रार होती. घरी येणारे बागेकडे बघतात आणि थोडे गोंधळतात. 'असली कसली बाग! हिला जरा नीटनेटकं ठेवलं तर किती छान दिसेल.' 'इथलं



गवत साफ करून घ्या!' कुणी सल्ला देतं. 'साप येतील.' स्वतःचा ओला कचरा पातळ प्लास्टिक पिशवीतून महानगरपालिकेच्या, कचरा घेऊन जाणाऱ्या गाडीत टाकण्यासाठी स्वच्छता कर्मचाऱ्याला देता देता एक आजी मला म्हणतात, 'सगळं एकदा स्वच्छ करून घे, डास येतात!' या सगळ्यांना बागेची गोष्ट सांगावी असं फार वर्षं मनात होतं.

कधी कुणी क्वचित कडुनिंबाची, अडुळशाची पानं मागायला येतं, कुणी फुलं तोडून घेतं, कुणी कारंदे चवीला छान लागले म्हणून आवर्जून कळवतं. त्यांनाही कधी पूर्ण गोष्ट सांगता आली नाही.

या बागेत छोटी मुलं नाचून गेली. वनस्पती-अभ्यासक मुद्दाम बघायला येऊन गेले. त्यांनाही मी ही गोष्ट सांगणं लागते.

मोकळ्या माळरानाचा प्लॉट होतो, प्लॉटमधे बंगला उभा राहतो, बंगल्याची इमारत होते आणि हे चालूच राहतं. माझे घर-परसूही त्याच स्थित्यंतरातून चाललं आहे. आज साधं घर आहे, अजून किती दिवस असं राहील सांगता येत नाही. बदल होताना, बागेला, स्वतःला दिलेला हा थोडा अवकाश. ही बागेची गोष्ट.



लहानपणी घरी एक लाकडी महिरपी पेटी भेट आली होती. ती उघडताच आत अजून एक, ती उघडताच अजून एक, मी हरखून गेले. आत काय असेल? अजून एक अगदी चिमुकली पेटी. या पेटीच्या आत काहीच नव्हतं. पण पेटीतली पेटी हीच गंमत. मला ती पुष्कळ दिवस पुरली. शाळेच्या वहीत पत्ता लिहिला, चिन्मय सोसायटी, गणेशमळा, पुणे, पुणे जिल्हा, महाराष्ट्र, भारत, आशिया, पृथ्वी, आकाशगंगा! तेव्हा हीच पेटीतली पेटी मनात होती. सगळ्यात मोठी पेटी सोडून प्रत्येक पेटी म्हटलं तर स्वतंत्र पण दुसऱ्या मोठ्या पेटीच्या आत. सगळ्यात छोट्या पेटीच्या आत... काहीच नाही! सगळ्यात मोठ्या पेटीच्या बाहेर? सर्वकाही, म्हणजे नेमकं माहीत नाही.

काही काळानं वाटलं, पेटीचं रूपक अगदी तंतोतंत नाही. सगळ्यात छोट्या पेटीत काहीच नाही असं कुठे होतं! आम्ही होतो ना. कुंपणाच्या भिंती म्हणजे काही चिन्मय सोसायटी नव्हती. आम्ही म्हणजेच चिन्मय सोसायटी होतो. चांगले उड्या मारत होतो, मस्ती दंगा करत होतो. सणवार, उत्सव साजरे करत होतो, एकमेकाला संकटात आधार देत होतो. या छोट्या पेटीचं प्रत्येक मोठ्या पेटीशी नातं होतं. पुण्यात काही झालं, तर त्याचे पडसाद आमच्या सोसायटीत उमटत होते. पुण्याबाहेर कितीतरी गोष्टी चालू असतील, त्यांचा परिणाम पुण्यावर होत असेल. आम्हाला सगळं तेव्हा ध्यानी येणं शक्य नव्हतं. लांब आकाशगंगेमधे ग्रहगोल वगैरे मंडळी आपापलं काम नीट करताहेत तेवढं ठीक कळलं होतं म्हणा, पण त्याच्याशी आमचं काही फार देणंघेणं नव्हतं. धूमकेतू बघायला गच्चीवर धावलो होतो, एवढंच. बाकी आकाशगंगा वगैरे 'बाह्य पेटी' आमच्यासाठी केवळ माहितीचा भाग होता. या पेटीच्या बाहेर काय असेल?




एकदा रूपक आपलंसं केलं की ते आपल्याला कुठच्या कुठे घेऊन जाऊ शकतं, लाक्षणिक आणि प्रत्यक्ष अर्थानं. आपण पेटीबाहेर काय असेल याचा सतत शोध घेतो आहोत. अवकाश आपल्याला खुणावतं. तिकीट काढून अवकाशमोहिमेवर जाण्याच्या युगाच्या अगदी नजीक आहोत. कदाचित आपल्यापैकी काहीजण लवकरच तसं करणार आहेत. त्यानं भारावूनही जाणार आहेत. कुतूहल शमवायला प्रत्यक्षात किंवा कल्पनेने कुठवरही विहार करू, पण पायाखालची जमीनही तेवढीच नीट माहीत हवी.



आमच्या सोसायटीचं अखिल आकाशगंगेशी काय नातं आहे हे काही जाणीवेच्या आवाक्यातलं नव्हतं. बाजूची नदी, टेकडी, रस्ता, बागा, वसाहती यांच्याशी सगळ्यात जास्त जिव्हाळ होतं. पुढे लक्षात येत गेलं, हा अनुभवही काही केवळ आपला नाही. जे आपल्या परसात जगतं, वाढतं, मरतं त्याच्याशी आपल्याला सर्वात जास्त देणंघेणं असतं. त्याच्याशी नातं जुळलं की विश्वाचं आर्त प्रकाशू लागतं.


परिसरातून विश्व जाणण्याच्या शोधातलं हे लिखाण आहे. आकाशगंगा आणि त्याहून पलीकडे पोचायच्या आधी घर-परिसर या छोट्या पेटीचा त्यातल्या त्यात मोठ्या पेटीशी, व्यापक पर्यावरणाशी कसा संबंध पोचत असेल, याचा शोध आहे.



झाड, माती, वारा, पाणी या सगळ्या ‘खऱ्या’ दुनियेतल्या गोष्टी आहेत. त्यावर खऱ्या दुनियेतल्या नियमांच्या सत्ता चालतात. सुंदर, अस्ताव्यस्त, पवित्र या साऱ्या माणसाच्या डोक्यातल्या, मानलेल्या दुनियेतल्या संकल्पना आणि गोष्टी आहेत. या एकमेकांना कुठे भेटतात? प्रस्तुत लिखाण याबद्दलही आहे.

पाळीव आणि मुक्त यांचं नातं उकलणारं आहे.

बागेच्या निमित्ताने, स्वतःला, आपल्या परिसराला समजावून घेण्याबद्दल आहे.



# باغ

बाग. फारसी शब्द आहे. मराठीच्या परसात येऊन रुजलेला. पावसाळी उन्हात मी बागेकडे बघतेय, मी शब्दाकडे बघतेय. खरंतर ही पूर्ण गोष्ट आहे. 'झेन' गोष्टीसारखी गोष्ट.

पण समोर निरगुडीच्या खोडाची बाहेरची साल एका ठिकाणी ताणून फाटली आहे, स्कर्ट थोडासा उचलून वर धरावा तशी वर उचलली गेली आहे. तिची आतली साल मला दिसतेय. आणि मी मनात विचार करतेय... हे किती सावकाश घडत गेलं!

बागेतलं भरभर आणि सावकाश... याकडे बघायचं तरी एक अवकाश हवा. आत्तातरी अवकाश आहे, मी आहे. बाजूने वेढलेल्या हिरव्या राखाडी आसमंतात मी विचार करतेय; बागेत काय सावकाश... काय भरभर.

बागेत खाली पडलेल्या काटक्यांवर वाळवी धरते, पहिला पाऊस पडून गेला की लाल विटा हिरव्या होतात, तगरीच्या पानांवर अर्धचंद्र काढून माशी नाहीशी होते, कोळी जाळं विणतो, घूस बीळ खणते, पक्षी घरटी बांधतात... हे सारं भरभर वाटतं, जेव्हा मी झाडांच्या खोडांत तयार झालेल्या ढोल्यांकडे बघते, पाचोळा कुजून तयार संपुष्ट काळ्या मातीकडे बघते, पुरुषभर अंतरावरच्या झाडाचं मूळ बाहेरच्या ओट्यापाशी येऊन टेकलेलं बघते... हे सावकाश.

माझ्यासाठी भरभर, माझ्यासाठी सावकाश.

नजरेच्या चिमटीत येत राहतात बागेतले क्षण. कधी कवडश्यानं उजळलेलं पान. झाडासाठी या पानाचं काय मोल असेल? मोरकिड्याचं घर, त्याला आज खायला काय मिळेल? कोण मिळेल? गोगलगाईनं मागे ठेवलेली चिकट रेष...



ही कुठं गेली एवढया झरझर?

सगळं नाही चिमटीत पकडता येत. अनेक गोष्टी दिसत नाहीत. लख्ख सूर्यप्रकाशातल्या अनेक गोष्टी दिसत नाहीत, अंधारातल्या गोष्टींबद्दल तर बोलायलाच नको. कुठल्या वेलींच्या तणाव्यांनी कुणाचं बोट कुठल्या क्षणी पकडलं असेल कसं सांगावं? खसपस ऐकू येते. निघाली घूस सफरीवर. नाश्त्याला माझी मेथी कामी येणार बहुतेक. हे अंदाज कधी चुकीचे ठरत नाहीत फार. चिमटीत न आलेल्या गोष्टींनी बागेत रोजचा दिवस नवा होतो.


थेंबात आकाश दिसावं त्याप्रमाणे सजीवनिर्जीव सृष्टीच्या प्रदीर्घकाळ चालू असलेल्या नर्तनाचं प्रतिबिंब बागेत दिसतं! मी इतकं पाहाते, की मी पुरेसं पाहात नाही असं वाटत रहातं. आस तशीच राहते, अजून पाहण्याची. पाहिलेलं साठवण्याची, साठवलेलं रुजू देण्याची, नवीन काही उमलू देण्याची...

टाईमलॅप्स फोटोग्राफी तेव्हापासून करून ठेवली असती तर पंचवीस वर्षांतला हा प्रवास कसा दिसला असता!?

घराभोवती चारही बाजूंनी बाग. बाग... खरंतर खडकमातीचा बराचसा मोकळा भाग. त्याला तीन बाजूंनी भिंती आणि एका बाजूला तारेचं कुंपण. त्यावर चढलेला मॉर्निंग-ग्लोरीचा जांभळा सुबक वेल. कोपऱ्यातलं एक चुकार सदाफुलीचं झाड. रुक्मिणी आणि सत्यभामेची गोष्ट खरी करून दाखवण्याच्या ईर्षेने वाढत असलेला एक बाल-प्राजक्त. मागे एक उंचापुरा माड, मागील दारचा गंधरूपवान मोगरा. पुढील दारातली जाई, तगर, फुलांच्या पुंजक्याचा एक आय्क्झोरा आणि दोन-प्रहरी चवरी ढाळणारा शेवगा. बस... एवढीच आठवण आहे मला त्यावेळच्या बागेची. साधारण पंचवीस वर्षांपूर्वीची. आजूबाजूची अंगणंही मोकळी. बैठी घरं. त्या अंगणांत पूजेला चालणाऱ्या आणि लागणाऱ्या फुलांची झुडपं जास्त. थोडी स्वयंपाकघराची सोय. कुठे कडीपत्ता, गवतीचहा, लिंबू. एखादया अंगणात आंबा. तोही आटोपशीरच. अशोक असे नामकरण झालेले उंच उंच जाणारे परदेशी सरळसोट. फाटकावर चढलेली नाजुकशी जाई-जुई.

मग यथावकाश घरं नवी होत गेली, मजल्यांवर मजले चढू लागले, पार्किंगच्या बाजूने बाग उभी राहू लागली. तिच्यात देशीविदेशी तालेवार मंडळी स्थापन झाली. कुठे ऑर्किड डोलू लागले, कुठे ऑल-स्पाईसेस घमघमू लागले, लिली हसू लागल्या, झर्बेरा डोलू लागले. कुणाकुणाकडे पाण्यातली लिली दर्शनसुख देऊ लागली. अनेक प्रकार आणि तऱ्हा.

मला आठवतंय, एके वर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला मी सोसायटीतल्या छोट्या मुलांना घेऊन रस्त्याकाठी उगवून आलेली झाडं गोळा करून आणली होती. आंबा, पेरू, सीताफळ, चिंच असली, बियांतून पडून आलेली झाडं. मग आम्ही ती पिशव्यांत ठेवली. मुलं पुढचे अनेक दिवस त्यांना बघायला येत राहिली. काही झाडं जगली. कुणाकुणाच्या शहराबाहेर असलेल्या जमिनीत लावली, एक दोघांनी होती तिथेच मुळं गुंतवली. पुढे बरेच बदल व्हायचे होते. पण मुलांच्या लक्षात राहिला हा अनुभव. अजूनही दुचाकीवरून जाताना रस्त्याकाठी आपली आपण उगवून आलेली झाडं, गवतं बघतात मुलं. आपलं आपण उगवण्याची ओळख!



बाग बऱ्यापैकी मोकळी होती. मी ही नव्या गोष्टी रुजवून घेत होते. इतर बागा सुबक सुंदर दिसत होत्या, माझ्या बागेला त्याची सक्ती नव्हती. एक दिवस तिथे कांचन आणि पांगारा आणून लावला. 'अंजनकांचनकरवंदीच्या देशा'तलं एक झाड आपल्याकडे आलंय याचं कौतुक. 'पांगारेपळसांच्या चवऱ्या तुजभवती' एकून पांगाऱ्यावर मन गेलं. निंबोणी रुजवून कडुलिंबाचं रोप तयार केलं होतं गौरीनं, माझ्या नणंदेनं. ते तिनं लावलं एका छान उन्हं येणाऱ्या कोपऱ्यात. त्यानंतर वीस वर्षांनी बाग कशी दिसणारे काही विचारच मनात आला नव्हता. रोपं लावून झाली होती, पर्णसंभार भविष्यात होता. बाजूच्या बागेतले गुलाब आणि कुंदकळ्या या बागेकडे आश्चर्याने बघत होते. एकच झुळूक त्या सगळ्यांवर  फिरत होती, पण त्यांचा भविष्यकाळ वेगळा असणार होता.

**The moment of the rose and the moment of yew tree, are of equal duration.**


बागेत अजूनही मोकळी जागा पुष्कळ होती, माझ्या मनातही अजून मोकळी कुरणं होती. अनोळखी, पण ताज्या विचारांचा मोकळा वारा त्या कुरणांवर यथेच्छ बागडत होता.



बाग, गार्डन, उपवन, वाटिका, उद्यान हे सगळे शब्द म्हटले तर वेगळे आणि म्हटले तर एका कुळातले. या सगळ्यात एक गोष्ट सारखी कुठली असेल तर ती म्हणजे रानव्याचा अभाव. रानवा राखला, वाढू दिला तर कुठे टिकणार आहे बाग आणि उद्यान? 'माजलेला झाडोरा' नकोच असतो कुणाला बागेत. गार्डन हा शब्दच मुळी कुंपण घालून सुरक्षित केलेला तुकडा अशा अर्थाचा आहे. कुणापासून सुरक्षित? रानापासून, रानव्यापासून. माणसानं एका जागी राहायला सुरुवात केली, शेत करायला सुरुवात केली तशी बागही आकार घेऊ लागली. आपलं परसू. तिथं कुणी रानातले ससे येऊन सगळं फस्त करून जाताहेत किंवा रानडुकरं सगळं उद्ध्वस्त करून जाताहेत हे नाही चालायचं.

नगरं, महानगरं आकाराला येऊ लागली तशा हळूहळू बागा हातपाय पसरू लागल्या. सुरुवातीला केवळ मोठमोठ्या राजेमहाराजांची, सम्राटांची विशाल उद्यानं असत. त्यांच्या सहलीसाठी, मृगयेसाठी निर्माण केलेली उद्यानं. तसे उल्लेख ग्रंथांमधेसुद्धा आहेत. इंद्राचं नंदनवन, कुबेराचं चैत्ररथ उद्यान. प्रजाजनांना त्यात काही हद्दीपर्यंत सहल करण्याची मोकळीक असे. सुपीक चंद्रकोरीतल्या बाबिलोनियन लोकांनी उद्याननिर्मितीत नवे अध्याय रचले. झुलत्या बागा तयार केल्या. हँगिंग गार्डन्स. पुढे मध्यपूर्वेत उद्यान-निर्मितीच्या कलेनं खूपच भरारी घेतली. पाणी खेळवण्याचे, कारंजी उडवण्याचे विविध प्रकार इथे जन्माला आले. पॅरडाईज निर्माण करण्याची चाह. परदा म्हणजे संरक्षणाच्या आड असलेला तो पर्दायेजा... पॅरडाईज. इराण किंवा तेव्हाच्या पर्शियापासून प्रसवलेली आणि युरोपमधे पसरलेली कल्पना. ग्रीक आणि रोमन मंडळींनी उद्याननिर्मितीवर आपला अमीट ठसा उमटवला.


पण तोवर एक गोष्ट पक्की झाली होती, बाग ही गोष्ट मोडून खाण्याची नव्हे. रंग, गंधासाठी, स्पर्शासाठी उपभोगण्याची आहे. तुम्ही सामान्य नागरिक असाल, तर तुम्हाला नाहीच परवडणार ती चैन. कारण तुम्ही सर्व वेळ अन्न पिकवण्यासाठीचं शेत राखण्यात गुंतलेले असणार, नाहीतर त्यावर आधारित काहीबाही करून स्वतःला जगवण्यात. 'बाग असणे' याचाच अर्थ तुम्ही श्रीमंत असणे, तुम्हाला मिरवण्यासाठी उपयोगाला येणारी जागा.



युरोपात मध्ययुगापर्यंत राजे-राजवाडे आणि उमराव मंडळींनी एकरच्या एकर हिरवीगार लॉन्स राखली. सामान्य माणसं बघत आणि स्तिमित होत. त्यांना त्यावरून चालण्याची मात्र परवानगी नव्हती. नव्हे, तसं कुणी केलं तर तो दखलपात्र गुन्हाच. भारतात मुघल राजवटीत बागांचे वेगवेगळे बहार माणसांनी पाहिले.

राजवटी ओसरल्या, लोकशाह्या अवतरल्या. बागा त्यासोबत लोप पावल्या? नाही नाही, आता आपल्या कर्तृत्वानं घर-बंगला बांधणाऱ्या माणसाच्या आवारात बाग अवतरली. राजाच्या नाकावर टिच्चून. अगदी लॉन, कारंज्यासह असलेल्या बागा अगदी आताआतापर्यंत आपल्या पुण्यात प्रभात-रोडवर बघायला मिळायच्या.


तो काळही ओसरत असताना पसरत असलेल्या शहरातली माझी छोटी गल्ली. बैठया घरांची वसाहत. घरांच्या बाजूने बाग घरंदाजपणाची शिस्त ल्यायलेल्या. तुळशीवृंदावन मागे पडलं होतं. आता मिरास आतील अनेकरंगी जास्वंदांची होती, वेलकमच्या बोर्डाला मिठी मारलेल्या जुईच्या नाजूक वेलाची होती.





माझ्या बागेनं काही गुलाबांना, कुंदाला, मोगऱ्याला नाही म्हटलं नव्हतं. तसे ते होतेही एक-दोन हौसेनं लावलेले. अजूनही आहेत. पण त्यांना जाणीव होत असावी भवताल बदलत असल्याची. कणाकणानं ऊन मिळण्याची जागा कमी होतेय... बागेत हिरव्या छत्र्या मोठ्या मोठ्या होताहेत, सावली धरताहेत.

एका बाजूला माझी रानव्याशी ओळख वाढत होती. आपण लावलेला पांगारा हा जंगलात वाढणारा पांगारा नव्हे, हे कळलं. गार्डन व्हरायटी. कांचन तर बोलून चालून सुशोभीकरणासाठीच. त्याचा भाऊ आपटा जंगलात सापडतो. तरी दसऱ्याच्या दिवशी आपटा समजून कांचनाला हात घालणारे आमच्या इथे आलेच. आता यांना वनस्पतींची ओळख करून द्यावी, की काहीही तोडलं नाहीत तर बरं असं सांगावं... पण काहीजण तो विकत होते. माझ्या घरच्या डहाळ्या तोडून माझ्याच गल्लीबाहेरच्या रस्त्यावर कापड अंथरून त्यावर ती पानं मांडून विकणारे मी पहिले आहेत. माझ्याकडे बघून ते किंचित ओशाळत असत. मला सुरुवातीला पानं तोडल्याचा राग यायचा. असं वाटायचं, 'निसर्ग आहे, झाडाला निसर्गतः पानं येताहेत, त्यात आपलं काही नाही, मग पैसे कसले करताय?'




पुढे लक्षात आलं, की सगळाच निसर्ग आहे. आपण पैसे देतो ते आपल्याला हव्या त्याप्रकारे आणून देणाऱ्या माणसाच्या सेवेसाठीचे. आपल्या मर्जीनं किंवा गरजेनं. त्या माणसांनी मला बघून ओशाळण्याची गरज नव्हती. रूढी-परंपरांच्या कल्पना जपणारी आपली प्रजाती. आपण कदाचित झाडाकडे बघून ओशाळलो तर ठीक वाटावं.

पण झाड तरीही वाढत राहिलं. 'कांचन म्हणजे आपटा नव्हे' हे ज्ञान माणसांपर्यंत पोचत राहिलं, अजूनही ते पुरतं पोचलेलं नाही. 'सोनं' द्यायची घ्यायची प्रथा अजून चालू आहे. रानाची ओळख करून घेताना असंही लक्षात आलं की आपटा हळूहळू कमी होतोय. एकांडे शिलेदार दिसतात इथे तिथे. पण त्यांवर घाला झाला तर अजूनच हानी. त्यापेक्षा कांचन ओरबाडला तर बरा वाटू लागला! झाडांना आपल्याला काय बरं वाटते आणि काय नाही याचा थांगपत्ता कधीच लागणार नाही. सूर्यप्रकाश, पाणी, क्षार आहेत तोवर ती जमेल तसे काम करत राहतील.

प्रतीकांच्या दुनियेत हरवणार नाहीत, ती बघत राहतील... जुळवून घेत राहतील...

सह्याद्रीत कोकणात फिरताना निर्गुडी तुमचं लक्ष वेधून घेते. एरवी रानात आढळणारी, पण कुंपणावर विराजमान झालेली निगड अथवा निर्गुडी बहुगुणी आणि सुस्वरूप. सावळं, खडबडीत नसलेलं खोड, हिरवी-काळी पानं, आणि जांभळे नाजूक फुलोरे. हे झाड मधमाश्यांविना अपुरं आहे. मधमाश्या त्याच्या सोबतिणी आहेत. घाटावर पाहिलं होतं, घमेल्यात निर्गुडीचा पाला घेऊन त्याचा धूर केला होता, निर्जंतुकीकरणाचा घरगुती उपाय. इतरही अनेक औषधी उपयोग मागाहून कळले. आणि गुण असा की झाडाची काठी आणून लावली तरी फूट सुरू. एकदम तीन फुटी झाड हाजीर. मी निरगुडी लावली. तिनं आपली चाल भरभर वाढवली. लवकरच तिनं कडूनिंब, कांचन, पांगाऱ्याची बरोबरी केली. आता सूर्य या साऱ्यांकडे पाहून हसू लागला... कोण मला झेलतंय, या बघू असे पुढे पटपट.

या झाडांच्या पसरणाऱ्या फांद्यांवर आधी पाहिले नव्हते असे पक्षी झोके घेऊ लागले. पक्षी बघायचे असतात हेसुद्धा आधी माहीत नव्हतं. बागेत नाचण पक्षी आला याचं कौतुक किती? पक्षी असतात, उडतात. चिमण्या कावळे माणसाला धरून राहतात. कबुतरं घाण करतात, कधीमधी पोपट दिसतात. बस एवढंच होतं ज्ञान. मग हळूहळू बुलबुल दिसू लागले. त्यांच्यातही दोन प्रकार. लाल गालांचा दिसला तर अजून आनंद. नाचणं, गिरक्या घेणं बघून जीव हरखला. सूर्यपक्षी चमकताना दिसला तर नजरबंदी होऊ लागली. अजून तर कितीतरी दिसायचे होते, कितीतरी यायचे होते.



झाड आणि पक्षाचं नातं हा विषय किती पानांत आटोपावा!? पण शिकता शिकता लक्षात आलं, फक्त झाड नाहीच, आख्खं भूचित्र आणि पक्षी यांचं नातं आहे. माझ्या बागेत येणारा पक्षी, माझ्या आजूबाजूच्या मोठ्या भूचित्राशी नातं सांगत असतो.  आमच्या घरापाशी एक बंद नाला आहे, पूर्वी तो एक उघडा प्रवाह होता... नदीला जाऊन मिळणारा. याची आठवण आम्हाला नसली तरी हेरॉनला होती. तो अजून येतो तिथे... मधून आठवण आल्यासारखा. अजूनही त्या नाल्याच्या खोलगटीत मिळत असेल त्याला काहीबाही. तो कडुनिंबावर येऊन बसतो, तो काही कडुनिंबासाठी नाही. तिथं बसून त्याची नजर वेध घेत असते, पाणी, जमीन इथल्या अनेक किड्यांच्या आसऱ्यांची.

झाडांतून पक्षी दिसत राहतात तेव्हा त्यांचे निरनिराळे अर्थ असतात. मला भूचित्र वाचायला ज्यांनी शिकवलं ते प्रकाश गोळेसर म्हणायचे, पक्षासाठी नुसतं झाड महत्त्वाचं नाही, तिथे त्याचं खाणं आहे हे बरोबर, पण पक्ष्याला हवी पर्णमुकुटांची विविधता. त्यांचे आत यायचे, बाहेर जायचे रस्ते. घरट्यासाठी आडोश्याच्या जागा, किड्यांची विविधता, माती, पाणी, चिखल हे सगळं हवं...

पाश्चात्त्य जगतात, जिथे गार्डन्स घडली तिथे सजीव कुंपणासारखे विचार पुढे येऊ लागले. अनेक पदरी सजीव कुंपणं. कीटक, पक्षी, छोटे प्राणी यांची हालचाल सुकर करणारे जिवंत कुंपण. त्यात झुडपं असतील, झाडं असतील, वेली असतील. वर्षभर फुलण्याचा ताल असेल... अनेक छोट्या छोट्या गोष्टी त्यांच्या अनुषंगानं घडत राहतील...

माझ्या बागेला तीन बाजूला भिंती आणि एका बाजूला लोखंडी जाळीचं कुंपण... या कुंपणाच्या बाजूनं सजीव कुंपण उभं राहू लागलं. पक्षांना निरोप गेले तसे फुलपाखरांना, मुंगसांना, खारींनाही गेले... आणखीही कोणी आले...






न लावलेल्या रोपांनी बाग सगळी भरून गेली
न बोलावलेली पाखरे तेव्हाच येऊन गाऊ लागली

आयजीच्या बागेचा कुणी दिला त्यांना पत्ता?
बायजीची पाखरे लुटून नेतील सारे आत्ता

असेच कोणी यावे जावे अशी फुलावी बाग निरंतर
आगंतुक अन् माझ्या मधले मिटून जावे उरले अंतर



पूर्वी आमच्या आवारात आणि आजूबाजूलाही अनेकदा साप दिसायचे. बरेचदा धामण. एकदा घोणसदेखील दर्शन देऊन गेला होता. कसं कोण जाणे, पण सापांना शेजाऱ्यांच्या घरात आत दोनदा प्रवेश मिळाला. एकदा बाथरूममधे त्याने आसरा शोधला आणि एकदा चक्क कपड्यांच्या कपाटात. इस्त्रीच्या कपड्यांतच जाऊन बसला होता. दोन्ही वेळेला होती धामणच, पण शेजारी अत्यंत सावध झाले. आता किडामुंगीलादेखील आत प्रवेश मिळणार नाही असा कडेकोट बंदोबस्त त्यांनी केला. अंगणही सुरक्षित झाले. मातीचे अंगण जाऊन फरश्या आल्या. कुठेही लपायला आडोसा मिळणार नाही अशी व्यवस्था झाली.

भूचित्र सांगत होतं की शेजारी ओढा होता. त्यांचं निवासस्थान असणार. टेकडीचे उतार संपल्यावर लागणाऱ्या सपाटीवरच्या या सोसायट्या. तिथे माळरानं आणि शेतं बघितलेले लोक आत्ता आत्तापर्यंत होते. या ठिकाणी लोकांनी घरं बांधली तेव्हा 'कुठं गावाबाहेर रहायला जाताय' अशी वाक्यं सर्वांनाच ऐकायला मिळाली. आता आमचा भाग इतका गजबजलेला आहे की ज्याचं नाव ते. ओढा झाकून टाकला, पाणी पाईपातून नेलं तरी सगळं एकदम कसं बदलेल?

एखादया सापाला वाटलं हे माझंच घर आहे आणि इथं राहणं हा माझा जन्मसिद्ध अधिकार आहे तर? सापाच्या बाजूने विचार करून माझ्या मनात कल्पना आली, सापांसाठी घर का न तयार करावे? मी काही त्याच्यासाठी खुलभर दुधाची वाटी ठेवणार नव्हते! मला त्याला आडोसा मिळवून दयायचा होता फक्त. तसा तो आडोसा मिळाला की साप इतरत्र संचार करणार नाहीत आणि हकनाक मारले जाणार नाहीत अशी माझी कल्पना होती.

मग ओंडके एकमेकावर रचले, दगडांच्या राशी केल्या. त्यात लपायला बरीच जागा होती. आता सापांचीच काय ती कमी होती. इतकंच झालं होतं, की हे सापाचे आसरे, झोपण्याच्या खोलीच्या भिंतीला लागून होते. एकदा माझा नवरा आणि त्याचे मित्र रात्री उशीरा घरी परतले. त्याच्याकडे त्यादिवशी किल्ली नव्हती. मला उठवायला म्हणून तो मागच्या अंगणात खोलीच्या दिशेनं येऊ लागला, तो पायाने 'थप थप' असे आवाज करू लागला. त्याच्या मित्रानं हा प्रकार बघून प्रश्नार्थक मुद्रा केली. माझा नवरा म्हणाला, ''इथे सापासाठी घर आहे, मला जपून जावं लागतं...''

हा किस्सा मित्रांमधे अजून सांगितला जातो. ‘इथे वनारसेही राहतात’ असं काही काळ मजेनं म्हणण्यात येत असे.

खरी गोष्ट अशी, की प्रयत्न करूनही साप येण्याचं हळूहळू कमी होत गेलं... आता तर साप दृष्टीस पडून बरेच दिवस झाले.

सरांचा आवाज कानात घुमतो, बाग हा भूचित्राचा एक छोटा हिस्सा आहे हे विसरू नकोस. भूचित्र बघायला, ओळखायला शिक.






टेकडीवरून समजतो भूचित्राचा अर्थ..

टेकडीवरून दिसते सिंहगड आणि त्याच्या सग्या डोंगरांची माळका. गडावरचा टीव्ही टॉवर दिसतो. ब्रिटनमधली गोष्ट आठवते.

इंग्लंड देशाच्या पूर्वेला वेल्स नावाचा प्रांत आहे. हा प्रांत बराचसा डोंगराळ आहे. पण डोंगर आणि पर्वत यात फरक पडतो ना. डोंगर कितीही असतील. पर्वत थोडेच असतात. नेमकी हीच गोष्ट वेल्स प्रांतातल्या 'टाफ्स वेल' नावाच्या गावात खळबळजनक ठरली. १९१७ साल होतं. पहिल्या महायुद्धाचा काळ. एके दिवशी टाफ्स वेल गावात नकाशा बनवणारे दोन सर्वेयर्स दाखल झाले. ते इंग्लंडहून आले होते. त्यांनी जाहीर केलं की ते गावाजवळच्या गार्थ नावाच्या पर्वताची उंची मोजणार आहेत. पर्वत याचा अर्थ १००० फुटाचा उंचवटा! १००० फुटाहून एक जरी फूट उंची कमी असेल तरी भू-विज्ञान त्याला पर्वत म्हणून मान्यता देणार नव्हतं. आणि इथेच गोष्ट सुरू झाली.

इंग्लिश कार्टोग्राफरांनी पर्वत मोजला आणि नोंद केली ९८४ फूट! म्हणजे पर्वताच्या व्याख्येच्या चक्क १६ फूट कमी. त्यांनी नोंद केली गार्थ टेकडी. एका दिवसात पर्वताची टेकडी झाली. इंग्लिश कार्टोग्राफरांनी खाली परत आल्यावर विनोद केले, पर्वत चढून गेलो आणि टेकडी उतरून खाली आलो! गावातल्या लोकांना काही कळेना. त्यांनी विचारलं काय आहे आमच्या पर्वताची उंची? कार्टोग्राफर हसत म्हणाले, ''अहो पर्वत कुठला आलाय, टेकडी आहे ती टेकडी!''



टेकडी? गावकऱ्यांना काही कळेना. मग कार्टोग्राफरांनी त्यांना काय झालं ते सांगितलं. १६ फुटांनी आपला पर्वत खुजा पडतोय? गावातल्या कुणालातरी एक कल्पना सुचली. समजा आपल्या पर्वतावर (कार्टोग्राफरच्या मते टेकडीवर) आपण एक दगडमातीचा ढिगारा उभारला तर? उंची हवी १६ फूट किंवा त्याहून जास्त. मग आपला पर्वत पर्वतच राहील. कल्पना नामी होती. पण कार्टोग्राफर मंडळींना चालणार होती का? तिथलं वातावरण बघून आणि 'शास्त्रातली सोय बघून' त्यांनी हो म्हटलं. गावकरी एकत्र जमले आणि त्यांनी कामाला सुरुवात केली. लहान मोठे, म्हातारेकोतारे सगळे कामाला लागले आणि त्यांनी रात्रभर खपून चक्क एक ढिगारा उभारला. त्याची उंची होती १८ फूट. काम झालं. कार्टोग्राफरांना आपली नोंद बदलावी लागली. टेकडीचा पुन्हा पर्वत झाला. गावात एकच जल्लोष झाला. कार्टोग्राफर परत गेले.

आजही तुम्ही या गावाला गेलात तर तिथे गावामागच्या पर्वतावर एक ढिगारा दिसतो. या ढिगाऱ्याची गोष्ट सांगणारं गावात कुणीतरी भेटतं. अनेक पर्यटक मुद्दाम हे गाव आणि हा पर्वत बघायला जातात. उंचवट्यावरचा उंचवटा बघून गालातल्या गालात हसतात.

सिंहगडावरचा टॉवर सिंहगडाला अजून उंच बनवतो की खुजा? माणसाने आपल्या कल्पनेच्या दुनियेत इतके फुगे उडवलेत की त्यांच्या मागे धावू नये हेच बरं. त्यांना उंच उंच जाताना बघावं. एखाद्याला टाचणी लागली तर तेही बघावं. हे सारं कल्पनेच्या दुनियेत चालू आहे ना, हे तपासावं.



सिंहगड त्याच्या टापूतला उंच डोंगर होताच. अशा उंच डोंगरांचा उपयोग मध्ययुगात युद्धासाठी होत होता. सगळ्या परिसरावर लक्ष ठेवायला. हा डोंगर इतर डोंगरांहून सगळ्यात उंच हे तेव्हा कसं कळलं असेल? कदाचित पुण्यातल्या एखादया टेकडीवर उभं राहूनही कळलं असेल. कदाचित माझ्या घरामागच्या टेकडीवर उभं राहून. ही टेकडी काय आणि ती टेकडी काय... सिंहगड मान ताठ करून उभा असल्याप्रमाणे दिसत राहतो. या सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या दरीत पक्षीनिरीक्षणाला जातात आमच्या शहरातली मंडळी. मीही जात असे. या दरीभोवती काही भिंती नाहीत... इथले पक्षी लांबून येतात, लांबवर जातात. त्यांच्या वाटा नदीकाठाने जातात; आंबे, पेरूंच्या बागांमधून जातात. माझ्या घराच्या बागेला एखादा 'टिकेल्स ब्लू' असा भेट देऊन जातो, हे सारं हळूहळू कळत गेलं.



टेकडीवरून नदी दिसते. डोंगरातून आलेली आणि डोंगरात परत जाता न आलेली. आता आली तर तिला वाहावं लागतं. तशी ती आता दोन्ही बाजूंनी बंदिस्त आहे. तिचं पाणी पसरण्याची आता पूर्वीसारखी गरज नाही... इथं काही आता शेतीबिती होत नाही. शेत जमिनीला जसं पूर येऊन गेला की डोंगरातून आलेला अन्नद्रव्यांचा खाऊ मिळतो तसं आता इथे जरूरी नाही. जरूरी आहे नदीनं बेताल न वागण्याची, बाजूच्या वस्त्यांमध्ये न घुसण्याची! त्याचा बंदोबस्त चालू आहे. पिण्याचं पाणी आता तिच्यावर बांधलेल्या धरणांतून काढलेल्या कालव्यांनी येतं. तिच्या पात्रातून पाणी वाहतं ते आता धरणातून सोडलेलं, मुख्यतः शेतीसाठी. तिच्या पात्रातून मी फार पूर्वी छोटे मासे पकडून आणले होते. माझ्या बागेत एक सिमेंटची कोंड आहे, तिच्यात हे मासे सोडले. ते गप्पी होते हे मागाहून कळलं. थोडं मार्सेलियापण त्याबरोबर आलं. माझी कोंड नाजूक हिरवी झाली. महानगरपालिकेचे अधिकारी डास नाहीत ना याची खातरजमा करायला येतात. कमलपाँड असा उल्लेख करतात. गप्पी मासे बघून समाधानी होतात. तिथे बेडूकमासे, पाणनिवळ्या आणि चतुरदेखील असतात. त्यांची नोंद होत नाही. त्याची गरज नाही...!


शुद्धीकरण केलेलं आणि न केलेलं सांडपाणी नदीत मिसळतं. पुढे जातं. जाता जाता थोडं अजून शुद्ध होतं, थोडं अजून खराब होतं. माझ्या बागेत एक पाणीविरहीत, चराचा संडास नाही का होऊ शकणार? मी सुरुवातीला प्रयत्न केला. पण मैला जिरवण्याएवढी बाग मोठी नाही. शिवाय शेजाऱ्यांचाही थोडासा प्रश्न झाला असताच. त्यात फार पुढे नाही जाऊ शकले. न्हाणीघरातील इतर पाणी मात्र बागेला सच्छिद्र पाईपने जाऊ लागले. पाईपभोवती हिरवाई वाढली. बाग खूष झाली. दूरवरची नदी पण खूष झाली असेल... मी मनोमन समजले.

शहर सर्व बाजूंनी टेकड्यांनी वेढलंय. या टेकड्यांवर माणसाचा पहिला वावर मेंढपाळाच्या आणि गवाऱ्याच्या रुपानं. त्याला आता हजारो वर्षे उलटून गेली. त्याची दगडी हत्यारं इथल्या दगड मातीत सापडली आहेत. गवारी, मेंढपाळ आजही दिसतात. वेताळ, भैरोबा, म्हातोबा अशी नावं त्यांनी टेकड्यांच्या माथ्यांवर देव वसवून त्यांना दिलेली आहेत. त्यांच्या कोकणात उतरण्याच्या आणि घाटावर परत येण्याच्या वाटेतल्या या जागा. खाली शेती सुरू झाली. शेतकऱ्यांशी त्यांनी जुळवून घेतलं. शेतात मेंढ्या बसवायच्या. शेताला खत, मेंढ्यांना गवत, मेंढपाळाला पै-पैका. पुढे शहर वाढलं, घरांच्या वसाहती टेकडीच्या अंगाखांद्यापर्यंत चढल्या. आता वनीकरण अशी एक गोष्ट मूळ धरू लागली. टेकडीच्या उतारांवर ग्लीरीसिडीया कधी लावले गेले आणि कधी गुलाबी फुलांचे तुरे मिरवू लागले काही कळलंसुद्धा नाही. इथली मोई, सालई, मेढशिंगी, बारतोंडी अंग चोरून उभ्या राहिल्या. या टेकडीवर भेकर आडवं गेलं आहे मला एकेकाळी.

ते आता दिसत नाही. ससा मात्र क्वचित सुसाट धावत येतो आणि दचकवतो. पण अनेकदा त्याच्या मागे त्याहून वेगानं धावणारं एखादं कुत्रं असतं आणि जीव हेलावतो. टेकडीप्रेमी अनेक नागरिक आहेत या शहरात. टेकडीसाठी खूप चांगली गोष्ट. परंतु ते प्रेम टेकडीपेक्षा त्यांच्या स्वतःच्या कल्पनांवर असतं. कुणाला तिथं आपल्या कुणाच्या स्मृतीसाठी रोप लावायचं असतं. कुणी शहराचे फुफ्फुस म्हणून. कुणी व्यायाम करायला मोकळी जागा म्हणून प्रेम करतो. एकच एक जातीचे झाड बरे नाही हा विचार पुढे आला मधल्या काळात. देशी झाडे लावायची असं ठरलं, मग ती झाडंही लावली गेली. देशी झाडाझुडांच्या बिया रुजवल्या गेल्या. पण अजूनही, अजूनही लक्ष गेलेलं नाही, रानवा आपला आपण कसा पसरतो, बहरतो याकडे. पण ती पुन्हा कधीतरी सांगण्याची गोष्ट.

भूचित्र समजावून घेताना काय दिसतं? रानवा, इथले पशुपक्षी यांना अभय पुरवायचं असेल. रानवा जोपासायचा असेल, तर निव्वळ टेकडीचा विचार करून चालणार नाही. टेकडी हा मोठा अधिवास झाला. त्याला जोड हवी अनेक छोट्या-मोठ्या आसऱ्यांची. शहरातल्या नैसर्गिक झाडोऱ्याने झाकलेल्या मोकळ्या जागा, ओपन प्लॉट, आणि घरांच्या बागा किंवा बागेतला एखादा कोपरासुद्धा या कमी मोठी भूमिका बजावू शकतो. टेकडीच्या पायथ्याला नदीला लागून असणाऱ्या वसाहतीत अनेकदा मुंगसं येतात, साप येतात, फुलपाखरंही येतात. त्यांचं या सगळ्या भूभागाशी नातं असतं. फक्त आपल्या बागेत यातलं कोण राहत असेल!?

आमच्या छोट्या सोसायटीचं नाव आहे 'हिल-व्ह्यू'. इथून एकेकाळी टेकडी दिसत होती. टेकडीलाही सोसायटी दिसत असेल. टेकडीला तेव्हा फारशी घरं पाहायची सवय नव्हती. एक अरुंद रस्ता, रस्त्याच्या बाजूने रिकामे प्लॉट, शेतमाळ इतकंच होतं बघण्यासारखं. तेव्हा इकडे येऊन राहणं गावाबाहेर येऊन राहण्यासारखं होतं. तसं ऐकायलाही मिळत असे गावात राहणाऱ्या लोकांकडून, कुठे जाता लंकेच्या तीराला! आता हा तीर ओलांडून गाव कुठच्या कुठे ओसंडलं आहे. लांबच्या डोंगरांना धडका देतं आहे. हिल-व्ह्यूनं या लाटेला आपल्या बरोबर इथवर आणण्यासाठी थोडी मदत केली आहे, तेव्हा हिल-व्ह्यू लाटेविषयी फार तक्रार नाही करू शकत. पण हिल-व्ह्यूला कधी हे नाही बदलता आलं, की तिच्या जवळून एक ओढा वाहतो. आता भलेही तो बंद प्रवाह असेल, पण पाणी वाहण्याची दिशा तीच आहे. हिल-व्ह्यूच्या सुरुवातीला एक मोकळा प्लॉट होता. अनेक वर्षं त्यात पावसाळ्यात अनेक गवतं रानफुलं उगवून यायची. मुंग्यांचं वारूळ होतं, टिटवीचं घरटं होतं. हे असे रिकामे प्लॉट शहराच्या भूचित्रात फार मोठी कामगिरी बजावतात. नदी आणि टेकडी या दोन मोठ्या अधिवासांना जोडणारे ते दुवे असतात. सिमेंट-काँक्रीटच्या घसरगुंडीवरून धावणारं पाणी इथे थोडं जिरतं. पावसाळ्यात रस्ते जेव्हा नद्या होतात तेव्हा मला हे ओपन प्लॉट आठवतात. तिथे रानवा राखता आला, तर रस्त्यांच्या नद्या होणार नाहीत. ओपन प्लॉट लवकरच स्वच्छ केले जातात. तिथे काही 'माजू' नये याची तजवीज केली जाते. एखादं मंदिर किंवा क्लब हाउस उभारलं जातं. फरशा बसतात. त्यांच्या भेगांतून काही काळ गवत डोकं वर काढतं. मग हळूहळू बंद होतं. पाणी घसरगुंडीवरून धावू लागतं.



ओढ्याजवळ असल्याने आमच्या बागेला खाली मुरूम आणि खडक आहे. पाणी जिरण्याची फारशी सोय नाही. मातीही चांगली नाही. अशा जमिनीत काय असावे आणि नसावे याबाबत माझ्या मनात एक पक्की संकल्पना नव्हती. कदाचित ती गोष्ट मला शिकण्यासाठी उपयोगी पडली. एकदा मी साधारण वीस वर्षांपूर्वी मी कुठूनसा एक पॅशनफ्रूटचा वेल घेऊन आले. या वेलाचं आयुष्य तीन वर्षांचं, असं मला त्या माळ्यानं सांगितल्याचं अजून आठवतं. आजही हा वेल माझ्या बागेत अजून फुलतो, फळतो आहे. फक्त तो जिथं मूळ जागी लावला, तिथं नाही. कुठंही, सर्वत्र. जिथं त्याचं बी रुजतं तिथून तो काम करायला सुरुवात करतो. गच्चीवर मी त्याची फुलं-फळं गोळा केली आहेत. मी त्याला पाणी घालत नाही. बागेत कुणालाच फार पाणी, बाहेरचं खत वगैरे मिळत नाही.


या सुमारास माझ्या मनात फुकुओका येऊन बसले होते. ज्यांनी 'One Straw Revolution' किंवा 'एका काडातून क्रांती' वाचलं आहे त्यांना माझ्या वाक्याचा अर्थ नीट कळेल. मासानोबू फुकुकोका जपानमधील एक शेतकरी आणि तत्त्वचिंतक होते. नैसर्गिक पद्धतीची शेती हा त्यांचा विषय. खरंतर जगण्याची ती रीत होती. ते काय बोलत होते त्याचा आपल्या परिसराशी आणि वातावरणाशी काय ताळमेळ बसतो हा विचार सुरू होण्याआधी मला सर्वत्र रानवा हवा होता, त्यात मी बिया फेकणार होते. आपलं आपण रुजून आलेल्या भाज्या, फळं खाणार होते. माझी बाग माझ्या स्वप्नात जेवढी मोठी होती, तेवढी प्रत्यक्षात ती नव्हती अशी एक अडचण होती.

माझी बाग आणि तिथला हरेक मोकळा कोपरा माझ्या प्रयोगाचे कुरण बनत होता. एकदा घोसावळ्याचे बी फेकलं. त्याला वेल येऊन तो इतका वाढला आणि त्याला इतकी घोसाळी लागली की शेजारी-पाजारीदेखील घोसाळ्याला बघून कंटाळून गेले. 'आता ती घोसाळी बंद कर' आमचे शेजारी म्हणाले. त्याचं कुठलं बटण होतं!?

घोसाळी वाळवून तिच्या आतलं जाळीदार स्क्रबर काढून ते भांडी घासायला वापरणे असा एक उपक्रम झाला. कालांतराने घोसाळे संपले. पण मनातले फुकुओका खूष होत राहिले.

कुठे आलं खोच, कुठे लसूण, कांदा, कुठे मिरचीचे बी टाक, लाव आणि विसरून जा असा आमचा खाक्या झाला. कधीतरी काहीतरी हाताला लागे. एव्हाना घुशींना मात्र सगळे लक्षात येऊ लागले होते. लावलेले बटाटे मी विसरले तरी घूस विसरत नव्हती.

माझ्या बागेला उपलब्ध असणारे सूर्यप्रकाश, पाणी, अन्नद्रव्य आणि माझी गरज याची सांगड काही मी नीट घातली नव्हती. आपण उबदार प्रदेशात राहतो. बाग सांभाळायचा उद्देश काय आहे हे ठरलेलं नव्हतं, तेव्हा थोडा बेहिशोबीपणा होताच. बागेतून सतत काही न काही मिळत राहायचं, तेव्हा बेहिशोबीपणातून काही कमी मिळालं नाही असं वाटू लागलं. हळूहळू अजाणत्या बेहिशोबीपणाकडून जाणत्या बेहिशोबीपणाकडे वाटचाल होत राहिली.



हौसेनं चार गोष्टी परसदारी लावायच्या ही एक गोष्ट झाली आणि बागेकडे आपला अन्नाचा स्रोत म्हणून पहायचे ही दुसरी गोष्ट. शहरी शेती असं काही असतं आणि ते गरजेचं ठरू शकतं हे मला क्यूबा देश आणि तिथल्या तेलसंकटाची गोष्ट ऐकली तेव्हा पहिल्यानं समजलं. १९९१च्या सुमारास सोविएत महासंघाच्या विभाजनानंतर क्युबाला रशियाकडून तेल मिळणं थांबलं. अर्थव्यवस्थेची चाकंच थांबली. शब्दशः रातोरात नागरिक आणि प्रशासन यांना जगणं चालू ठेवणं यासाठी काही निर्णय घ्यावे लागले. त्यात एक प्रमुख गरज होती अन्नाची. इतर तेल आधारित अर्थव्यवस्थेत असते त्याप्रमाणे क्युबातही शहरापासून दूर गावात भाजीपाला पिकवला जायचा आणि तो वाहनांमधून शहरात यायचा. शहरात माणसं तो भाजीपाला, फळं पैसे देऊन विकत घ्यायची. अगदी आपण करतो तसंच.

संकट ओढवलं तेव्हा लक्षात आलं, शेतीलाही तेल लागत होतं आणि वाहतुकीलाही. आता यातलं काय आणि कसं कमी करता येईल? एक पर्याय असा की शहरात शेती सुरू करायची. घराच्या बागांमध्ये, अगदी कुंड्यांमध्ये, मोकळ्या जागांवर जिथे पूर्वी शोभेची फुलझाडं आणि हिरवळी प्रचंड देखभालीत वाढत होत्या तिथे कांदे-बटाटे, मिरच्या, रताळी यांच्या बागा उभ्या राहू लागल्या. रासायनिक खतं शक्य नव्हतीच. तर माणसे आपसूक सेंद्रिय पद्धतींकडे वळली. त्याचे फायदे त्यांच्या लक्षात आले. माणसं खाण्याचा विचार




वेगळ्या तऱ्हेने करू लागली, भूक भागणे आणि अन्नात पौष्टिक मूल्य जास्त मिळणे हे दोन्हीही कसं साध्य करता येईल असा विचार सुरू झाला... आणि शहरी शेती उभी राहिली. तिथल्या आठवडी बाजारात आता माणसे अधिक चोखंदळपणे खरेदीविक्री, देवाणघेवाण करू लागली. आता तेलसंकट ओसरलं आहे तरी माणसांना जुन्या व्यवस्थेकडे परत जावे वाटत नाही. नवी आरोग्यपूर्ण आनंदी व्यवस्था अंगवळणी पडली आहे.

या गोष्टीलाही आता दोन दशकं होऊन गेली. मी क्युबाला जाऊन सध्या तिथं काय घडतं आहे याचा अनुभव घेतलेला नाही. पण मला ही गोष्ट वेधक वाटली. संकटातून जास्तीत जास्त काय चांगलं जन्माला येऊ शकतं तर हे...

संकट नसेल तर हे कसं साध्य करता येईल?

पावसाळ्यात कधी महाराष्ट्रातल्या खेडोपाड्यात फिरलं तर परसबागा लक्ष वेधून घेतात. वेलींचे मांडव दिसतात, त्यावर चढलेले वेगवेगळ्या आकारांचे भोपळे, कारली, तोंडली आणि वेलींवर उगवणारे कंद. स्वयंपाकघरातलं पाणी वाहून नेणारे छोटे पाट दिसतात, त्यावर हिरवेगच्च झालेले अळू, कधी हळद आणि कर्दळी! पावसाळ्यात इथे शेणावर, टोपल्यांतूनही भाज्या उगवतात. हे सारं हळूहळू उमलत जाणाऱ्या रांगोळीप्रमाणे दिसतं. आपण हात धुतलेल्या, भांडी घासलेल्या पाण्यावर तरारून येणारं हे धन पाहून घरच्यांचे डोळे निवत असतील.





त्यासाठी प्रत्येकानं हौसेनं काही दिलेलं असतं, केलेलं असतं. कुणी झावळ्यांचं झाप केलेलं असतं, कुणी कारवीच्या काठ्यांचा मंडप केलेला असतो. कुणी निर्गुडीचं कुंपण. कोण कंद आणतो, कोण बिया पेरतो, कोण त्यांची देखभाल करतो... यात घरदार गुंतलेलं असतं.

मला जास्त पावसाच्या भागात रानात उगवणारे कंद हवे वाटले. नुसते उकडून मीठ लावून खाल्ले तरी पोट भरलं, खाणं मस्त झालं असा प्रकार. त्यांचं पौष्टिक मूल्य काय अशी फार चर्चा मी मनात आणली नाही. त्यांनी पोसलेली काही जितीजागती तुकतुकीत कांतीची, निरोगी माणसं माझ्यासमोर होती. मी हळूहळू कंद गोळा करायला सुरुवात केली. काही फक्त जमिनीच्या पोटात मोठे होणारे, काही वेलीवर लगडणारे... हळूहळू माझ्या बागेत कंद रुजू लागले. वेगवेगळ्या आकारांचे कंद. कधी त्यांचं सूप, कधी काप जेवणात रंगत आणू लागले. हे कंद फुकुओकांना धार्जिणे होते. त्यांनी कधी पाणी मागितलं नाही की खत. वेळ झाली की ते जमिनीतून डोकं वर काढतात आणि काही शब्दशः बघता बघता झाडांच्या शेंड्यावर पोचतात. त्यांच्या सुबक पानांतून पोपटी सूर्यप्रकाश गळतो... बागेला थोडं अजून देखणं करतो.

अशीच एकदा रानातून करवंदं आणली. बिया मातीत टाकून दिल्या. एका करवंदानं जोर पकडला, तो वेलू गगनावरी गेला. गच्चीत करवंदं मिळू लागली. करवंदं आमची कधीच झाली नाहीत ही गोष्ट वेगळी. जरा काळं झालं की करवंद कुणा चोचीत गेलंच समजा. तरी घरच्या करवंदांचं अप्रूप. एकदा करवंदं मिक्सरमधून फिरवली होती, बियांसकट. तो

चोथा कुंडीत टाकला तर त्यातून रोपं उगवून आली. केवढा चिवटपणा बीचा. ही झुडपी वेल अनेक ठिकाणी सह्याद्रीची माती सांभाळते आहे. जंगल कातरलं गेलं तर ही डोकं वर काढते, जंगलाच्या बाजूने वाढते. भरपूर काळी मैना खाऊ घालते आणि मुळांनी माती धरून ठेवते.

आमच्या घरच्या एका आजीला करवंदाचे किती प्रकार ठाऊक होते! लोणचं, ठेचा, सरबत, जेली! तिनं गावातल्या बायांना ते शिकवलेसुद्धा. एकेवर्षी बायकांनी गावच्या जत्रेत करवंद ठेचा आणि भाकरी करून विकलं... हातोहात विकलं गेलं. बायका खूष. खाणारे खूष. बिया पुन्हा रानात!

मला करवंद सुखावते, ते तिच्या फळांनी नाही, फुलांनी. उन्हाळ्यात रात्री उघडया आकाशाखाली झोपताना जेव्हा गच्चीत या फुलांचा मंद वास पसरलेला असतो, तेव्हा उन्हानं तळावलेलं शरीर मन किती हलकं फूल होतं! पक्ष्यांना फळं आणि मला सुगंध... करवंदानं आम्हाला भरभरून दिलं आहे.




करवंदासारखीच तुती, तोरणं ही फळं आमची नाहीत... पक्ष्यांनी गायलेली गाणी आमची आहेत. पालवीचे, फुलांचे रंग, गंध आमचे आहेत...




शेवग्याचं झाड पुष्कळ जुनं. त्याच्याकडे मी थोडी उशीरानेच पाहू लागले. सुरुवातीला मला त्याच्या ओबड-धोबड शेंगा बघून 'हे काय!' असं वाटलं होतं. मी तोवर पाहिलेल्या शेंगा कशा लांबसडक आणि सतेज. या शेंगांवर फोड दिसायचे. ढब्बू शेंग, शिजायलाही जरा टणक. चव थोडी कडूसर. मला वाटलं हा शेवगा असा कसा? पुढे एक गोष्ट कळली की, आमच्या शेजाऱ्यांच्या जावयानं हा शेवगा आमचं मूळ गाव असलेल्या डहाणूशेजारच्या उंबरगावातून आणलाय. त्यानं दोन आणले होते. त्यातला आमचा जगला. वाढला, फोफावला. त्याला भरभरून शेंगा येऊ लागल्या आणि दुसऱ्या बाजूच्या शेजारच्यांना डोकेदुखी ठरला. कायम त्याच्या फांद्या छाटण्याविषयक विनंत्या ऐकून या शेवग्याला काय वाटत असेल? पण तोही बधला नाही, त्याची एक बाजू आम्हाला अशा तऱ्हेनं तोडत राहावं लागलं की जणू त्याला त्यानं काही फरक पडणारच नाही. राहिलेल्या फांदीवर तो शेंगा देतच राहिला. कदाचित जगण्याच्या इर्षेनं थोड्या जास्तच. पण तो तगून राहिला. आम्ही त्या वेगळ्या चवीच्या, भरपूर गराच्या शेंगा खायला शिकलो. जावयाला त्याचा वाटा दरवेळी जातोच हे सांगणे न लगे. सासरेबुवा मला आवर्जून सांगत, 'तो आमचाच आहे अगं! तुमच्याकडे फक्त लावायला दिलाय.' मीही हसून मान डोलवायची.

खरंतर हा शेवगा समुद्राच्या खाऱ्या वाऱ्याचा होता. त्या भूमीत निपजलेला. आपल्याला ज्या चवी नेहेमीच्या नसतात त्यांच्याशी जुळवून घ्यायला वेळ लागतो, पण त्या आवडू लागतात, अंगवळणी पडतात, आपल्यात मिसळून जातात. शेवग्याची शेंगच काय, पण पानंसुद्धा अनेक पदार्थात मिसळू लागली. चवीची गंमत वाढू लागली.

मी हटेल शेवग्याकडे बघत राहते, त्याची प्रकाशाची आस बघत राहते. त्याचं न बदलणारं वर्तन बघून विचार करत राहते...



माड पटकन उंच झाला होता पण त्याला फळ नव्हतं... वीस वर्षे व्हायला आली तेव्हा माझ्या मनात विचार आले, नसेलच तो फळणार. पण त्याच्या झावळ्या होत्या, आमचे दिलीपकाका त्याचे खराटे बनवत होते. इतरही काय काय, पण नारळ? अगदी गेल्यावर्षी फळ धरलं. मला काही यात असं वाटत नाही, की मी तोडण्याचा विचार मनात आणला तो झाडाला कळला आणि त्यानं फळ दिलं. याहून वेगळ्या बऱ्याच गोष्टी होऊ शकतात, झाल्या. झाडाला पाणी मिळत नाही फार. त्यानंही वेळ लागला असेल. खाली जमीन खडकाळ. झाडानं वेळ घेतला. सुरुवातीला छोटी फळं खारी खाऊन टाकायच्या... हळूहळू त्यातून वाचलेली फळं मोठी झाली आम्हाला मिळू लागली. रात्री कधीतरी आवाज येतो, धप्प! आम्ही दचकून जागे होतो आणि विचार करतो. उद्या नारळ मिळणार.



पपया अशाच उगवून येतात टाकलेल्या ओल्या कचऱ्यातून. एक संत्र्याचं झाडही आहे बागेत याचा शोध आम्हाला गेल्याच वर्षी लागला, तेही असंच कचऱ्यातून आलेलं. फळ थोडं छोटं आहे, पण तक्रार कुणाकडे करणार? सगळाच फुकट मामला. टोमॅटो, मिरच्या, गेलाबाजार वांगंसुद्धा कचऱ्यातून. मिळेल तेवढं आपलं. एकदा एका मित्राला पापडीच्या शेंगा दिल्या बागेतल्या, तर त्याच्या आईनं छान मुठिया भाजी करून दिली त्या शेंगा घालून. आता तशी भाजी करण्यासाठी आम्ही शेंगांची वाट बघतो.

हळद, आलं, वेखंड, शतावरी, गुळवेल, अडुळसा, गवती चहा, तुळस सारं काही इथेच आहे. जराही आवाज न करता ही सारी आपापलं चक्र सुरू ठेवताहेत. फुलतात, फळतात, मातीत मिसळतात. बाग हेच औषध आहे. औषध नलगे मजला! गवती चहापाशी जाते तेव्हा पात्यांकडे बघते. नवं नाही तोडायचं, जुनं तोडताना बगलेतलं एखादं सुकुमार पातं नाही दुखवायचं, असं करून एक पातं घेऊन येते. रोजचा चहा असा सुखावतो, संवादाने फुलारतो.



आमच्या मागेही एक मोकळा प्लॉट आहे. पलीकडच्या सोसायटीचा हा प्लॉट त्या गल्लीच्या अगदी शेवटाला असल्याने इकडे कुणाची फारशी वर्दळ नसते. एक मंदिर आहे. काही वर्षांपूर्वी इथे काही बाप्ये आले आणि त्यांनी एक तात्पुरतं झोपडं उभारलं. एक शेड. मजूर असावेत. संध्याकाळी ते इथं अंग टाकायला येतात, आपल्या जाड, बेसूर आवाजात गाणी गातात. ते सोबतीचं गाणं जरा वेळ गोड वाटतं. कधीकधी मात्र 'रात्री तरी गाऊ नका' असं सांगायची वेळ येऊन ठेपते. पण तसं प्रत्यक्ष सांगायची वेळ काही अजून आली नाही. दिवसा इथे काही वेगळ्याच गोष्टी चालतात.

एक दिवस गवतातून आवाज ऐकू आले, 'यशोदेचा बाळ, कंसाचा काळ, गरीबांचा वाली आणि वैजयंतीचा बाली (!?) किस्ना कुठं दिसत नाही तो! आणा बरं शोधून त्याला कुठं गेला माझा चित्तचोर?'

काय चाललंय काही कळेना! 'कोण आहे रे तिकडे?' आम्ही विचारलं.

'काही नाही, काही नाही. आम्ही नाटक करतोय.'

अच्छा! आम्ही मुबलक हसलो. कुठल्याश्या स्पर्धेत नाटक करण्यासाठी मुलांची तालीम चालली होती. ना स्टेज, न लाईट्स, ना कसली सुविधा. तरी त्यांना मजा येत होतीच.

जरा रान मोकळं मिळालं की काय उगवेल सांगता येत नाही! आनंद आहे.

हा प्लॉट आणि आमच्या प्लॉटची भिंत एक आहे. भिंतीपलीकडे सुबाभूळ आणि स्पॅथोडियाची झाडं आहेत. त्यांनी आमचा प्रकाश अडवून टाकला आहे. सुबाभळीच्या काटक्या-फांद्या अनेकदा आमच्या अंगणात पडतात. बिया तर लाखोंनी पडतात, रुजतात. त्यांनी रुजवण क्षमता बघून थक्क व्हायला होतं. त्या सगळ्या बियांचे वृक्ष होत नाहीत ही केवढी भाग्याची गोष्ट, पण तरी मोठी होत चाललेली रोपटी काढून टाकावी लागतात, कधी जोर पकडतील सांगता येत नाही.

इंधन आणि आपण याचा विचार करण्याची हीच ती वेळ होती. या काळात मी अनेक प्रयोग केले. काटक्या, शेंगा, पाला-पाचोळा, करवंट्या, कोळसा आणि कागद यांचे प्रयोग. सधूर, निर्धूर, तीन दगडांची, ते पत्र्याच्या उभ्या चुलीपर्यंत अनेक संयंत्रे वापरून पाहिली. बंबही त्यात होता. थंडीच्या दिवसात बंबात पाणी तापवायचे. उन्हाळ्यात गरम पाणी लागतच नाही. पावसाळ्यात काय तो हीटर वापरायचा. थंडीचा रंग चराचरावर कसा चढतोय ते बंबात घालायच्या लाकडांवरून समजायचं.

थंडीच्या सुरुवातीला ओली, जाळायला नाखूष असलेली लाकडे पेटता पेटत नाहीत. त्यावेळी मग 'अग्निमीळे पुरोहितं' वगैरे पाच हजार वर्षांपूर्वी का सुचलं असेल ते कळायला लागतं. हिवाळा जसजसा चढतो तसतशी लाकडं कोरडीठाक व्हायला लागतात, आज्ञाधारकपणे पेटतात. संक्रांतीनंतर तर ती फारच साळसूदपणे वागतात. ती तशी वागू लागली की गरम पाण्याची हौसही कमी व्हायला लागते. ग्रीष्मागमने लाकडे नकोत आणि गरम पाणी नको असे होऊन जाते, त्यावेळी लाकडे सर्वात उत्तम जळू लागलेली असतात! हे सारं फार मजेचं आहे. रोज सकाळी बागेत काटक्या, लाकडे वेचणे, करवंट्या जमवणे, बंब पेटवणे याने वेळ फार चांगला जातो. काय जळतं जळत नाही आणि कसं ते बघायला मिळालं. मी दर महिन्याला वापरावे लागणारे नॅपकीन जाळून पाहिले, नीट जळले तर नाहीतच, शिवाय नकोसा वास येत राहिला. मग ते बंद केलं. पुढे नॅपकीन वापरणंही बंद केले. अनेक पर्याय आहेत. ते लक्षात येऊ लागले. हा प्रश्न फक्त नॅपकीनच्या पर्यायांचा नाही, जीवनशैलीतील पर्यायांचा आहे हे लक्षात आलं. सगळे काही दरवेळी उपलब्ध असतात आणि वापरता येतात असं नाही. चुलीची राख भांड्यांना मिळत होती. ते पाणी बागेला जात होतं. आई म्हणायची, तुझा वेळ सगळा चुलीत जातो!

आमच्या शेजाऱ्यांना धूर चालला म्हणून हे जमलं. शहरात अजून यावर निर्बंध नाहीत म्हणून इतकं सारं करून बघता आलं. हीसुद्धा चैनच!



*नवव्या शतकात युनमेन् वेन्यान् नावाचे एक चिनी झेन गुरू होऊन गेले.*


*एका भिक्षुनं त्यांना प्रश्न केला : पानगळीमुळं झाडांची रया जाईल. मग काय होईल?*

*युनमेन् उत्तरले : सोनवारा!*

बागेतल्या अजून एका झाडाविषयी सांगणं भाग आहे. तीवर! सुमारे अकरा वर्षांपूर्वी फयान नावाच्या वादळात मी समुद्रकिनारी हिंडत होते. त्यावेळी खाडीपाशी वाढणाऱ्या या नितांत सुंदर झाडाचं रोप मला मिळालं. मी ते घरी आणून वाढवायचं ठरवलं. समुद्रकिनारा माझ्या शहरापासून पुष्कळ लांब. मधे घाट आहे. हे रोप आपलं आपण तर कधीच इथवर येऊ शकलं नसतं. पण चारचाकी गाडीत बसून आलं बापडं. तिथली हवा, पाऊस, माती सोडून आलं. मला तोच तर 'प्रयोग' करायचा होता... की ते इकडे वाढतं कसं. मी फक्त हवामानाचा विचार करत होते. त्याचे 'भाईबंद' असा विचार काही माझ्या मनात नव्हता. झाडं एकेकटी नसतात असा विचार अजून माझ्याच मनात रुजायचा होता. झाडांची एकमेकांशी नाती असतात, मैत्र असतं, मदत असते. झाडं एकमेकांशी जमिनीखालून बोलतात, हवेतून संदेशांची देवाणघेवाण करतात. जमिनीखाली बुरशी त्यांना मदत करते. झाडांना आवश्यक त्या गोष्टींची ने-आण करते, हवेतून गंधाच्या भाषेतून झाडे एकमेकांशी बोलतात. एकमेकांना धोक्याचे संदेश देतात. हा सगळा विषय अतिशय सखोल आहे. त्यामुळे वर सुटी-सुटी दिसत असलेली झाडं एका कुटुंबाचा भाग असू शकतात हे माहीत करून घेणं किती गरजेचं होतं! मी मात्र रोप घेऊन आले आणि लावलं. ते जगलं. आम्ही कधीकधी त्यावरून गंमतसुद्धा करत असू, की झाड बघून भविष्यात कुणाला वाटायचं की इथंवर समुद्र होता की काय! पण त्या झाडाच्या एकाकीपणाचा विचार मी केला नव्हता. अकरा वर्षं ते झाड नुसतं उभं होतं. उंचीत फार वाढ नव्हती. त्याच्या डोक्यावर शेवग्याचं छत्र आलं होतं. त्यानंही फार हिरिरी दाखवली नव्हती. दर पावसाळ्यात तांबूस हिरवी पानं शेंड्याकडे यायची आणि पुन्हा जैसे थे. हे झाड खुंटलं होतं! निदान मी तरी आशा सोडून दिली होती. आणि या वर्षी तिथला लालस सुकुमार फुलोरा नजरेस पडला. मी दचकलेच. पुन्हा पुन्हा खात्री केली. झाड चक्क फुललं होतं. कोणालाही सुगावा न लागू देता झाड आपला वेळ घेऊन अखेर फुललं होतं. काय झालं असेल या ११ वर्षांत? सुरुवातीचा काळ झाड कदाचित गोठलं असेल, नव्या ठिकाणी श्वास घ्यायचा कसा हे ते अजमावत असेल. ही प्रक्रिया पुरी होऊन त्यात हळूहळू बदल

झाले असतील. पेशींना निरोप गेले असतील. जगायचंय, वाढायचंय, फुलायचंय. कोणत्या कीटकांना सुगावा लागला असेल या नव्या फुलांचा? कोणत्या भुंग्याने मान वेळावून पाहिलं असेल?

*कसे केव्हा हेलावते*
*कसे अरुवार उमलते*
*कसे कोणत्या उर्मीने*
*वेडे जगून राहते*



‘ॲलिस इन वंडरलँड’ नावाच्या सुप्रसिद्ध पुस्तकात एक गोष्ट आहे. ॲलिस बागेत जाते आणि तिथं फुलांना एकमेकांशी बोलताना ऐकते. तिला आश्चर्य वाटतं. तुम्ही सगळे इतकं छान कसं काय बोलू शकता? ती विचारते. मी आजवर इतक्या बागांमधे गेले आहे, पण मी कधी फुलांना बोलताना नाही ऐकलं.

‘‘इथल्या मातीला स्पर्श कर, म्हणजे तुला कळेल,’’ एक लिलीचं फूल म्हणतं.

‘‘ही जमीन तर चांगली कडक झालीये,’’ ॲलिस म्हणाली. ‘‘पण त्याचा काय संबंध?’’

‘‘त्याचं असं आहे, की बऱ्याच बागांमधे जमीन अगदी मऊ ओली ठेवतात. त्यानं फुलं सारखी झोपी जातात,’’ लिली उत्तरते.

सारखी निगराणी ठेवलेल्या बागेत फुलं झोपी जातात. बाग अगदी पाळीव आहे. जंगल पाळीव नाही, तिथं कोणी खत, पाणी घालायला जात नाही. तिथं वनस्पती आपल्या आपण वाढतात, पसरतात. त्यांना कधीकधी एकमेकासोबत स्पर्धा करावी लागते. कोण सूर्यप्रकाश मिळवायला उंच जाणार, कोण खाली जमिनीत खोलवर पाणी प्यायला मुळं पसरणार... जंगलात सगळं वेगळं होतं. तिथली झाडंसुद्धा त्यामुळे धट्टीकट्टी  होतात. पाणी नाही मिळालं तरी गळून जात नाहीत. एखादया वेळी पावसानं ओढ दिली की लगेच वाळून जात नाहीत. पानं गाळतात, एकमेकाच्या साथीनं राहतात, कीटकांशी आणि पक्षांशी, वटवाघळं आणि मातीतल्या जीवजंतुंशी दोस्ती करतात आणि वर्षानुवर्षं छान राहतात. अशी झाडं आणि फुलं तुमच्याशी बोलली तर त्यात नवल ते काय! बागेतली फुलं मात्र स्वतः काही करावं न लागल्यामुळे झोपी जातात.



सगळी बाग हेच एक जगून राहिलेलं चित्र आहे, सतत बदलणारं चित्र. शिप ऑफ थिसिअससारखं. यातलं काहीच कायमस्वरूपी स्थिर नाही, ओळखू येणार नाही इतकं वेगवानपणे बदलणारंही नाही. हा बदल म्हणजे काही शोभादर्शक यंत्रातल्या काचांच्या जोडण्यांसारखा नाही. त्यात कितीही वेगवेगळ्या रचना समोर आल्या तरी मूळ काचा त्याच असतात, त्या बदलत नाहीत. या बागेला मात्र शहरात मिळेल तेवढा मोकळा वारा मिळतो. बिल्डिंगा, फ्लायओव्हरच्या गर्दीतून पोचलेले अनाहूत पाहुणे इथे भेट देतात. कुणी पाखरं इथं कुणीकडून आणलेल्या बिया रुजवतात. पाण्याचे लोट नवे अन्नकण आणतात, सिमेंटच्या जगातली थोडी रसायनंही आणतात. बाग सगळं काही पचवतेय. अजूनही उभी आहे, हिरवी आहे, खरी आहे.

किती दिवस अशी राहील, सांगता येत नाही. हिचं म्युजियमही करता येणार नाही, आम्ही करणार नाही. पाण्यावरच्या रांगोळीसारखं हे जिवंतचित्र काळाच्या प्रवाहावर जितके दिवस राहील तितके दिवस राहील. पण हा प्रवास जिवंत होता याची साक्ष आमच्या मनात जिवंत राहील. लवकरच कुठलेसे बॉट्स, ॲप्स अगदी अशीच बाग थ्री-डीमधे करून दाखवतील, मला शंका नाही. तुम्ही खिडकी उघडलीत की तुम्हाला हवी तशी बाग! त्या अनुभवावर आधारित कुणी काही लिहीलसुद्धा... मी लिहिलंय तसं. आणि त्यालाही वाचक भेटतील. तो काळ आतापासून फार पुढे नाही. त्यामुळे जिवंतपणाची साक्ष मी देणे याला तरी काय अर्थ उरला?

आणि तरीही हे लिखाण मी केलं आहे. वीस-पंचवीस वर्षांचा अनुभव मोजक्याच पानांत मांडला आहे. बरंचसं शब्दात न सापडलं, ओघळलं, विरून गेलं... त्याचा सोनवारा झाला!

आताही मी बागेकडे पाहते आहे... पावसाळी ऊन आहे. मी काय लिहिता आलं नि काय नाही ते बघते आहे... खरंतर ही पूर्ण गोष्ट आहे. 'झेन' गोष्टीसारखी गोष्ट.

गदिमांची उसनवारी करून सांगायचं तर -

*जंगलाचा वा नदीचा तोच आपला वंश आहे*
*माझिया बागेत थोडा रानव्याचा अंश आहे.*



- **मृणालिनी वनारसे** यांना विविध विद्याशाखांमध्ये रुची आहे. तत्त्वज्ञान, संस्कृत, निसर्गविज्ञान (इकॉलॉजी) भारतविद्या (इंडोलॉजी) या विषयांमध्ये त्यांनी औपचारिक शिक्षण घेतले आहे. विविध विद्याशाखांमधील पूल शोधणे ही त्यांच्या जिव्हाळ्याची गोष्ट आहे. पुस्तकं आणि लॅपटॉप यांच्याही आधीपासून डोंगर-दऱ्या आणि रानव्याशी त्यांची मैत्री झाली आहे. त्यांच्या लिखाणातही तोच शोध चालू असतो.

  www.mvanarase.com या त्यांच्या वेबसाईटवर त्यांच्या कामाविषयीची अधिक माहिती मिळू शकेल. त्यांची पुस्तकं, प्रकल्प, ब्लॉग या सर्वांची माहिती या वेबसाईटवर आहे. 'सोनवारा' हे पुस्तकदेखील येथे free downloadसाठी उपलब्ध आहे.

- **निधी शहा** 'यूझर एक्सपीरियन्स डिझायनर' आणि 'व्हिज्युअल कम्युनिकेटर' असून त्या कला, डिझाईन आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात काम करतात. त्यांना आंतरशाखीय प्रकल्पांमध्ये काम करायला आवडते. शिक्षण, डिझाइन आणि तंत्रज्ञान या तिन्ही शाखांचा एकत्रित विचार करून प्रकल्प आरेखन करण्यास त्या उत्सुक असतात. सभोवतालच्या निसर्गाचे निरीक्षण करणे आणि ते टिपून ठेवणे यात त्यांना अतिशय आनंद मिळतो. त्यांचा ई-मेल आहे nidhimshah93@gmail.com

थोडे शब्द, थोडी पानं
सोनवाऱ्याची झुळूक
माती, पाणी, प्रकाशाने
गंधवान आसमंत...
ही गोष्ट आहे
एका शहरी बागेला
लाभलेल्या
रानव्याच्या स्पर्शाची.
गोष्ट हरक्षणी बदलत्या भवतालाचे
काही क्षण मुठीत धरून ठेवण्याची.

